



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १११। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । ०९/०५/२०२६ । पान - ६




# दहावीच्या निकालात मुलींचा डंका

## राज्याचा निकाल 92.09 टक्के

## कोकण विभाग पुन्हा अव्वल



पुणे (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत ही परीक्षा घेण्यात आली. यंदा दहावीचा निकाल ९२. ९ इतका लागला आहे. यामध्ये कोकण विभागाने पुन्हा एकदा बाजी मारली आहे. सर्वात कमी निकाल हा छत्रपती संभाजीनगरचा लागला आहे. या परीक्षेत पुन्हा एकदा मुलींना बाजी मारली असून ८४. ९६ इतक्या मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. राज्यातील नऊ विभागीय मंडळातून १५,५५,०२६ नियमित विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. नियमित विद्यार्थ्यांपैकी १४,३०,४६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नियमित विद्यार्थ्यांचा एकूण निकाल ९२.०९ टक्के इतका लागला. तसेच खाजगी विद्यार्थ्यांची एकूण नोंदणी २९,५०६ इतकी होती, यापैकी २२,००३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. खाजगी विद्यार्थ्यांचा निकाल ७६.३३ टक्के इतका लागला आहे. एकूण १४,५२,१४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या परीक्षेत पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारली असून मुलींचा निकाल ९४.१६ टक्के इतका लागला आहे. तर मुलांचा निकाल ८९.५६ टक्के लागला आहे. मुलींचा निकाल मुलांपेक्षा ५.६० टक्क्यांनी अधिक आहे. यंदा. १०,०३१ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या दिव्यांग विद्यार्थ्यांपैकी ९,०४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दहावीच्या परीक्षेत एकूण ४०२ कॉपी प्रकरणे आढळली असून सर्वाधिक ८२ कॉपीची प्रकरणे नाशिक विभागात आढळली आहेत.

# हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती

## तिगावकर संतप्त, ठप्प पाणी पुरवठ्यामुळे तिगाव संकटात; आंदोलनाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील तिगाव गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस भीषण होत चालला असून, तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गेल्या दोन वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने ग्रामस्थांचे अक्षरशः हाल होत आहेत. गावातील विहिरी बोअरवेल कोरड्या पडल्याने महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी तातडीने पर्यायी पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.


संग्रहित छायाचित्र

तिगाव ग्रामस्थांच्या वतीने गुरुवारी (दि. ७) संगमनेर तहसील कार्यालयाला निवेदन देण्यात आले. यावेळी सरपंच ज्ञानेश्वर सानप यांनी प्रशासनाचे लक्ष वेधताना सांगितले की, निळवंडे गावातील खंडोबा माळ परिसरातून निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्यालगत पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन गेलेली आहे. त्या ठिकाणी पाण्याचा उद्भव उपलब्ध असून विद्युत पुरवठाही जवळ असल्याने तेथे तात्पुरत्या स्वरूपात विद्युत पंप बसवून गावाला त्वरित पाणीपुरवठा करणे शक्य आहे. प्रशासनाने तत्काळ ही पर्यायी योजना सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, तिगाव गावासाठी असलेली तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गेल्या दोन वर्षांपासून ठप्प आहे. निंभाळे ते वाकण कोल्हेवाडी दरम्यान मुख्य पाइपलाइनच्या सुमारे ८०० ते ९०० मीटर भागाची दुरुस्ती रखडलेली असून, हे काम केवळ १५ दिवसांत पूर्ण होऊ शकते. मात्र वारंवार होणारे अडथळे आणि काम बंद पाडण्याच्या प्रकारांमुळे ही योजना अद्याप सुरू होऊ शकलेली नाही. परिणामी हजारो नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे.

गावातील परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून महिलांना डोक्यावर हंडे घेऊन मैलोनमैल पाणी आणावे लागत आहे. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांचे हाल होत असून पाण्याअभावी नागरिकांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक कुटुंबांना दिवसातून एकदाच पाणी मिळत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. तसेच पोलिस बंदोबस्तात रखडलेले पाइपलाइन दुरुस्तीचे काम त्वरित पूर्ण करून बंद असलेली तळेगाव पाणीपुरवठा योजना पूर्ववत सुरू करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. अन्यथा येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या निवेदनावर गावातील अनेक ग्रामस्थांच्या सह्या असून प्रशासनाने आता तरी या गंभीर पाणीटंचाईकडे लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी एकमुखी मागणी तिगावकरांकडून होत आहे.

# संगमनेरच्या विवाहितेचा सासरच्यांनी घेतला बळी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यात गेल्या काही दिवसांपासून महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. त्यातच आता नाशिकच्या जेलरोड परिसरातील दसकगाव येथे एका ४० वर्षीय विवाहितेने सासरच्या छळाला कंटाळून आपली जीवनयात्रा संपवल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. आशा प्रवीण घोटेकर असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी नाशिकरोड पोलिसांनी पतीसह ६ जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पतीसह २ जणांना अटक केली असून सध्या याचा पुढील तपास सुरू आहे.

संगमनेर तालुक्यातील कासारा दुमाला येथील रहिवासी गणेश गोपाळराव वाळके यांची बहीण आशा हिचा विवाह २००८ मध्ये दसकगाव येथील प्रवीण साहेबराव घोटेकर याच्याशी झाला होता. लग्नानंतरची पहिली काही वर्षे सुखात गेली. मात्र २०१८ पासून आशा घोटेकर यांना सासरच्या लोकांनी छळायला सुरुवात केली. त्यांचे पती, सासू, सासरे आणि दीर हे त्यांच्याकडे वारंवार पैशांची मागणी करायचे. ही मागणी करून त्यांनी आशा यांना मानसिक आणि शारीरिक कोंडीत पकडले होते.त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २०१८ मध्ये फ्लॅट आणि चारचाकी वाहन खरेदी करण्यासाठी माहेरुन २५ लाख रुपये आणावेत असा तगादा सासरच्यांनी लावला होता. बहिणीचा संसार सुखाचा व्हावा या भावनेतून गणेश वाळके यांनी आपल्या आईच्या नावावर असलेली जमीन विकून ही रक्कम सासरच्यांना दिली होती. मात्र एवढी मोठी रक्कम देऊनही सासरच्यांची हाव संपली नाही. त्यांनी आशा यांचे २१ तोळे सोन्याचे दागिनेही काढून घेतले होते. आशा यांना तिचे पती प्रवीण घोटेकर याचे अन्य एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. याबाबत त्यांनी जाब विचारला असता, त्यांना वारंवार शारीरिक आणि मानसिक त्रास देण्यात आला. इतकेच नव्हे तर सासरच्या मंडळींनी त्यांना घराबाहेर काढण्याची धमकी दिली होती. जादूटोणा करून तुला मारून टाकू, अशी भीतीही त्यांना घातली असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

बुधवारी (६ मे) सकाळी ७ च्या सुमारास आशा यांनी आपल्या खोलीचा दरवाजा उघडला नाही. सासरच्यांनी ही माहिती त्यांच्या माहेरच्यांना दिली. आशा यांच्या नातेवाईकांनी नाशिकला धाव घेतली. मात्र त्यापूर्वीच त्यांना बिटको रुग्णालयात मृत घोषित करण्यात आले होते. आपल्या बहिणीला आत्महत्येसाठी प्रवृत्त करण्यात आल्याचा आरोप गणेश वाळके यांनी केला आहे.

# खा. निलेश लंके यांची प्रकृती खालावली, पुण्यात उपचार सुरु



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे डॅशिंग खासदार निलेश लंके यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना उपचारांसाठी पुण्यातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून त्यांच्यावर अहिल्यानगरमध्येच उपचार सुरू होते मात्र प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने डॉक्टरांनी त्यांना पुण्याला हलवण्याचा सल्ला दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, खासदार लंके यांना गेल्या काही दिवसांपासून शारीरिक थकवा आणि अस्वस्थतेचा त्रास जाणवत होता. स्थानिक डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. परंतु, प्रकृतीतील गुंतागुंत पाहता अधिक चांगल्या वैद्यकीय सुविधांसाठी त्यांना पुण्यातील प्रसिद्ध 'रुबी हॉल क्लिनिक' येथे हलवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या एका पथकाच्या देखरेखीखाली त्यांना पुण्यात नेले जात आहे.निलेश लंके यांच्या प्रकृतीची बातमी वाऱ्यासारखी पसरताच अहमदनगर आणि त्यांच्या मतदारसंघात समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. लंके हे आपल्या कार्यकर्त्यांमध्ये सतत सक्रिय असतात, मात्र प्रकृतीमुळे त्यांना आता काही काळ विश्रांती घ्यावी लागणार आहे. अद्याप त्यांच्या प्रकृतीबाबत रुग्णालयाकडून अधिकृत वैद्यकीय बुलेटिन प्रसिद्ध करण्यात आलेले नाही. मात्र, त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याची प्राथमिक माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून मिळत आहे.

# भू-संपादन घोटाळा प्रकरण

## माजी जिल्हाधिकारी पाठक यांना अटक

बीड (वृत्तसंस्था)

बीड जिल्ह्यातील जायकवाडी भूसंपादन घोटाळयात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात भूसंपादनाच्या कामात बनावट सह्या वापरुन जुन्या तारखेत भूसंपादनाचे सुमारे ७२ कोटी रुपये अदा करण्यात आले होते. तर सुमारे २४१ कोटी ६२ रुपयांचे घोटाळा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी उघडकीस आणला होता. या प्रकरणात अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीचे नमुनेही तपासणीस पाठविले होते. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यास अटक झाल्याने खळबळ उडाली आहे.



बीड जिल्ह्यातील या भूसंपादन घोटाळ्यात काही कर्मचाऱ्यांचे व्हॉटस् प वरील संभाषण आणि बनावट सह्यांचे नमुने गोळा करुन दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासात अविनाश पाठक यांचाही सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी अविनाश पाठक यांना लातूर येथून अटक केल्याचे सांगण्यात आले. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे सध्या रजेवर आहेत. अतिरिक्त पोलीस अधिकारी सचिन पांडकर यांनी अविनाश पाठक यांना ताब्यात घेतल्याच्या वृत्तास दुजोरा दिला. दरम्यान या प्रकरणात पूर्वी दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास एम व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाालाी सुरू होता.

बीड जिल्ह्यातील कोट्यावधी रुपयाच्या भूसंपादन घोटाळा प्रकरणी बिडमध्ये गुन्हा दाखल झाला होता.बीड मधील वरिष्ठ भूसंपादन कार्यालयाच्या १५४ प्रकरणात जवळपास २४१ कोटी ६२ लक्ष रुपये वाढीव मोबदल्याचे बनावट आदेश तयार करण्यात आले होते . या प्रकरणी तपास करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून एक विशेष तपास स्थापन करण्यात आली होती. या पथकाने बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना चौकशीसाठी हजर राहण्याची नोटीस देण्यात आली होती. दरम्यान शुक्रवारी तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक पोलिसांच्या चौकशी समिती पुढे हजर झाले.









# पालक स्वतः ठरवतील आता शाळेचे बजेट आणि विकास

नवी दिल्ली(वृत्तसंस्था)

केंद्र सरकारने सरकारी शाळांच्या व्यवस्थेत बदल करत मे २०२६ पासून नवीन मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या ऐतिहासिक बदलांतर्गत, देशातील सुमारे १५ लाख शाळांचे व्यवस्थापन आता थेट पालकांच्या हातात असेल.

नवीन नियमांनुसार, शाळा व्यवस्थापन समितीला (एसएमसी) ३० लाख रुपयांपर्यंतची बांधकाम कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) मंजुरीशिवाय स्वतः करण्याची आर्थिक शक्ती देण्यात आली आहे. शिक्षण मंत्रालयाने या सुधारणांना नवीन शिक्षण धोरण (एनईपी) २०२० आणि शिक्षण हक्क कायदा (आरटीई) २००९ अंतर्गत अंतिम स्वरूप दिले आहे, ज्यामुळे आता शाळा केवळ सरकारी संस्था न राहता 'सामुदायिक मालमत्ता' म्हणून विकसित होतील. या व्यवस्थेतील सर्वात मोठा बदल 'चेकबुक पॉवर'मध्ये आहे. आता शाळेचे बँक खाते मुख्याध्यापक आणि एसएमसी अध्यक्ष (पालक) यांचे संयुक्त खाते असेल, ज्यामुळे पालकांच्या संमतीशिवाय निधीचा वापर करणे शक्य होणार नाही. यासोबतच, शाळांना आता सीएसआरद्वारे खाजगी कंपन्यांकडून निधी घेण्याची कायदेशीर परवानगीही मिळाली आहे.

व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी आता सरकारी ऑडिटसोबतच वार्षिक 'सोशल ऑडिट' अनिवार्य करण्यात आले आहे, ज्यात शाळेच्या प्रत्येक पैशाचा हिशोब सार्वजनिकपणे नोटीस बोर्डवर लावावा लागेल. 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारून पोलीस आणि आरोग्य विभागासोबत मिळून थेट कारवाई करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे.

नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार आता समित्या पुढील तीन वर्षांची 'शाळा विकास योजना' (एसडीपी) तयार करतील, ज्यामुळे पायाभूत सुविधा आणि शिक्षण सुविधांची दरवर्षी समीक्षा करता येईल.

# जुगार अड्ड्यावर छापा; रोख रक्कमेसह साहित्य जप्त

## पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन ॲक्शन मोडमध्ये



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव- जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदाची सुत्र हाती घेताच मुम्मका सुदर्शन यांनी बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांच्या 'झिरो टॉलनरन्स' धोरणाचा प्रत्यय आता ग्रामीण भागातही येऊ लागला असून, संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलिसांनी बोटा परीसरात सुरू असलेल्या मोठ्या जुगार अड्यावर धाड टाकून सात जणांना ताब्यात घेतले.

नूतन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पदभार स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील गुन्हेगारी आणि अवैध व्यवसायांवर वचक निर्माण करण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्यांना दिल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर घारगाव पोलीस ठाण्याचे पथक गस्तीवर असताना त्यांना बोटा-आकलापूर रस्त्यावरील एका पत्र्याच्या शेडमध्ये तिरट नावाचा जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि.६) दुपारी १:३० वाजेच्या सुमारास पोलिसांनी पंचासह याठिकाणी छापा टाकला. पोलीस आल्याचे पाहताच जुगारींची एकच धावपळ उडाली, मात्र पोलिसांनी घेराव घालून सात जणांना जागीच ताब्यात घेतले. यामध्ये संगमनेर, जुन्नर आणि ठाणे जिल्ह्या-तील इसमांचा समावेश आहे. यामध्ये रवी बाळासाहेब जाधव (वय ३५, रा. राजापूर), बन्सी गोविंद गमे (वय ६६, रा. बोटा), गोपाळ नरसिंग भालके (वय ४४, रा. कोठे बुद्रुक), नीलेश यादव हरड (वय ४७, रा. उदापूर, जुन्नर), भालचंद्र देहू तेहके (वय ४२, रा. ठाणे), सुरेश पंढरीनाथ डुबे (वय ५४, रा. गुंजाळवाडी), मारुती भाऊ घाडगे (वय ६९, रा. पिंपरी पेंढार, जुन्नर) अशी त्यांची नावे आहे.

या कारवाईत पोलिसांनी ८ हजार ४८० रुपये रोख आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पो-लीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल सुभाष बोडखे व पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

अवैध पोलीस धंदे दरम्यान, नूतन अधीक्षकांच्या आदेशानुसार सुरू पठारभागातील झालेल्या या सलग कारवायांमुळे चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. त्यांनी गुन्हेगारांवर कडक कारवाईचे संकेत दिल्याने आगामी काळात अशा कारवायांची तीव्रता अधिक वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे

# 20 मे रोजी राज्यातील सर्व मेडिकल राहणार बंद



मुंबई (वृत्तसंस्था)

येत्या २० मे २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या आणि रुग्णांच्या चिंतेत भर टाकणारी एक मोठी घडामोड समोर येत आहे. पुण्यासह संपूर्ण राज्यभरातील औषध दुकाने (मेडिकल स्टोअर्स) या दिवशी कडकडीत बंद राहणार आहेत. हा संप केवळ राज्यापुरता मर्यादित नसून, तो अखिल भारतीय स्तरावर पुकारण्यात आला आहे. अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने' या देशव्यापी आंदोलनाचे नेतृत्व केले असून, इंटरनेटवरून कोणतीही शहानिशा न करता चालणारी बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री आणि बड्या कॉर्पोरेट कंपन्यांनी बाजारात निर्माण केलेली जीवघेणी व्यावसायिक स्पर्धा याला कडाडून विरोध दर्शवण्यासाठी देशभरातील लाखो औषध विक्रेते २० मे रोजी आपले शटर डाऊन ठेवणार आहेत.

या तीव्र आंदोलनाबाबत सविस्तर भूमिका मांडताना संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर ताशेरे ओढले. त्यांच्या मते, कोणत्याही ठोस नियमांविना राजरोसपणे सुरू असलेली ऑनलाईन औषध विक्री केवळ स्थानिक व छोट्या व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान करत नाहीये, तर ती थेट रुग्णांच्या सुरक्षिततेशी आणि जिवाशी खेळत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी केंद्र सरकार, संबंधित मंत्री आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने देऊनही त्यांनी याकडे सोयीस्कररीत्या डोळेझाक केली असल्याचा गंभीर आरोप संघटनेने केला आहे. प्रशासनाच्या याच उदासीनतेमुळे अखेर संपाचे हत्यार उपसण्याची वेळ औषध विक्रेत्यांवर आली आहे. असे असले तरी, या बंदच्या काळात कोणत्याही गंभीर रुग्णाच्या जिवावर बेतू नये याची काळजी घेण्यात आली असून, केवळ जीवनरक्षक आणि अत्यावश्यक औषधे रुग्णांना विनाअडथळा उपलब्ध करून देण्याची विशेष व्यवस्था संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

# राज्यातील प्रत्येक सरकारी रुग्णालयांत 'पीसीओडी क्लिनिक'




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील महिला आणि युवतींमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या 'पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसॉर्डर' (पीसीओडी) या समस्येवर मात करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले आहे. आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांच्या सूचनेनंतर, राज्यातील उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये आता विशेष 'पीसीओडी क्लिनिक' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दर १५ दिवसांतून एकदा हे क्लिनिक विशेष रुग्णसेवेसाठी कार्यरत राहणार आहे. महाराष्ट्रातील महिलांच्या आरोग्याचा विचार करता, दर १०० महिलांमागे पीसीओडीचे प्रमाण ११ ते २१ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. ही आकडेवारी चिंताजनक असल्याने सरकारी स्तरावर विशेष कक्ष असणे आवश्यक होते. त्यानुसार, आता प्रत्येक जिल्हा आणि उपजिल्हा स्तरावर या क्लिनिकच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार उपलब्ध करून दिले जातील. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहायक संचालक (माता आरोग्य) यांची 'नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या रुग्णालयांत नियमित स्त्रीरोगतज्ज्ञ उपलब्ध नाहीत, तिथे 'आयपीएचएस' अंतर्गत नियुक्त कंत्राटी तज्ज्ञांची मदत घेतली जाणार आहे. तसेच, कार्यरत स्त्रीरोगतज्ज्ञांना या विषयावर विशेष प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

माता आरोग्य कक्षाद्वारे या उपक्रमाचा दरमहा आढावा घेतला जाईल आणि त्याचा अहवाल आरोग्य राज्यमंत्र्यांना सादर केला जाईल. ग्रामीण भागातील महिलांपर्यंत ही माहिती पोहोचवण्यासाठी उपसंचालक आरोग्य सेवा (आयईसी), पुणे यांच्यामार्फत व्यापक प्रसिद्धी मोहीम राबवण्यात येणार आहे. पंधरवड्यातून एक निश्चित दिवस ठरवून हे क्लिनिक चालवले जाईल, जेणेकरून दूरवरून येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होणार नाही. हा संप्रेरकांमधील (हॉर्मोन्स) असंतुलनामुळे उद्भवणारा विकार असून, यामुळे मासिक पाळीत अनियमितता, वंध्यत्व, वजन वाढणे आणि चेहऱ्यावर लव येणे यांसारख्या समस्या निर्माण होतात.

# अनोळखी इसमाचा गळफास घेतलेला आढळला मृतदेह



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याची घटना बुधवारी (दि. ६) संध्याकाळी संगमनेर तालुक्यातील वेल्हाळे गावच्या शिवारातील श्री हरी बाबा मंदिराच्या मागे घडली.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम पोलीस विभाग करत असून जर कोणाकडे या व्यक्तीबद्दल काही माहिती असेल, तर त्यांनी तातडीने शहर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शहर पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी केले आहे.

# पाणी टंचाईवर दिलासा

## प्रवरा नदीला आवर्तन सोडणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - उन्हाची वाढती तीव्रता आणि नदीकाठच्या गावांमधील पाण्याची टंचाई लक्षात घेऊन, दिनांक १० मे २०२६ पासून प्रवरा नदीपात्रात पाणी सोडण्याच्या सूचना जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकार्यांना दिल्या आहेत. मागील काही दिवसांत उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे गावांमधील पाण्याचे उद्भव आटल्याने गावपातळीवरील पाणीपुरवठा योजनांचे स्त्रोत कमी पडू लागले आहेत.

परिणामी पिण्याच्या पाण्याचा आणि शेती पिकांचा प्रश्न गंभीर झाला असून, टंचाईग्रस्त गावांमधून टँकरची मागणी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर, अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी केली होती. यावर मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याची माहिती घेतली. तसेच भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन दि. १० मे २०२६ पासून प्रवरा नदीपात्रात आवर्तन सोडण्याचे नियोजन करण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे अकोले, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यातील गावांना मोठा दिलासा मिळणार असून पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा तसेच जनावरांच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मोठी मदत होणार आहे. उपलब्ध पाणी अतिशय काटकसरीने वापरावे, पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि शेवटच्या गावाला पाणी मिळेपर्यंत जलसंपदा विभागाने सतर्क राहावे, अशा कडक सूचनाही मंत्री विखे पाटील यांनी अधिकार्यांना दिल्या आहेत.

# नाशिक पोलिसांची मोठी कारवाई

## निदा खान पोलिसांच्या ताब्यात



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिक येथील बहुचर्चित टीसीएस धर्मांतर प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिला अखेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून फरार असलेल्या निदाला छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली आहे. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी अत्यंत गोपनीयरीत्या संयुक्त कारवाई करत ही मोठी कामगिरी बजावली.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, निदा खान छत्रपती संभाजीनगरमधील नायगाव परिसरात लपून बसली होती. याची खात्री होताच पोलिसांनी परिसरात सापळा रचला आणि संध्याकाळच्या सुमारास तिला ताब्यात घेतले. अटकेनंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तिला पुढील तपासासाठी नाशिक पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

नाशिकमधील आयटी क्षेत्रातील नामांकित कंपनी असलेल्या टीसीएसमध्ये काम करणाऱ्या काही तरुणांना टार्गेट करून त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याचा खळबळजनक प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला होता. या प्रकरणात निदा खानवर तरुणांचे ब्रेनवॉश करणे आणि त्यांना धर्मांतरासाठी प्रवृत्त केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. हे प्रकरण समोर आल्यापासूनच नाशिकसह संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. हिंदुत्ववादी संघटनांनी या प्रकरणी आक्रमक पवित्रा घेत आरोपींच्या अटकेची मागणी केली होती. गुन्हा दाखल झाल्यापासून निदा खान पोलिसांना चकवा देऊन फरार झाली होती. तिच्या अटकेसाठी नाशिक पोलिसांची विविध पथके रवाना करण्यात आली होती. निदा खानच्या अटकेमुळे या धर्मांतर प्रकरणामागे नेमके कोणते रॅकेट सक्रिय आहे का? तसेच तिला कुणाचे पाठबळ मिळत होते? या प्रश्नांची उत्तरे आता तपासातून समोर येण्याची शक्यता आहे. नाशिक पोलीस आता तिची सखोल चौकशी करणार असून, या प्रकरणात आणखी काही जणांची नावे समोर येण्याची चिन्हे आहेत.

# मनोहर भोसलेनंतर माढ्यात आणखी एक भोंदू बाबा

सोलापूर (वृत्तसंस्था)

सोलापूर जिल्ह्यात भोंदू बाबांविरोधातील कारवाईचा धडाका सुरू असतानाच आणखी एका स्वयंघोषित महाराजाचा पर्दाफाश झाला आहे. मनोहर भोसले उर्फ मनोहर मामाच्या अटकेनंतर आता माढा तालुक्यातील आडेगाव येथील नाना महाराज उर्फ गुरु माऊली वीरकर याला टेंभुर्णी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. फसवणूक, जादूटोणा आणि लोकांची दिशाभूल केल्याच्या आरोपांमुळे वीरकर महाराज अडचणीत आला आहे. पहाटेच्या सुमारास पोलिसांनी आश्रमावर छापा टाकत वीरकर आणि त्याचा मोठा भाऊ विकास वीरकर यांना झोपेतूनच उचलल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, गुरु माऊली वीरकर याने अध्यात्म आणि भविष्य सांगण्याच्या नावाखाली अनेक लोकांना जाळ्यात ओढले होते. मोठमोठे राजकीय नेते आणि प्रभावशाली व्यक्तीही त्यांच्या आश्रमात येत असल्याची चर्चा परिसरात होती. याच प्रभावाचा वापर करून वीरकर याने अनेकांना आर्थिक फायद्याचे आमिष दाखवले. जादूटोणा, भविष्य बदलवणे आणि पैशांचा वर्षाव होईल अशा दाव्यांमुळे अनेक लोक त्याच्या संपर्कात आले होते. मात्र, आता पोलिस तपासात या सर्व गोष्टींच्या माध्यमातून फसवणुकीचा मोठा प्रकार सुरू असल्याचे समोर येत आहे. या प्रकरणातील फिर्यादी पंढरपूर तालुक्यातील एक पीडित व्यक्ती आहे. संबंधित व्यक्तीला व्यवसायात मोठा फायदा करून देण्याचे आमिष वीरकरने दाखवले होते. माझ्याकडील कासव घे, तुझ्यावर पैशांचा पाऊस पडेल, असे सांगत त्यांच्याकडून मोठी रक्कम उकळण्यात आल्याचा आरोप आहे. मात्र, व्यवसाय वाढण्याऐवजी संबंधित व्यक्तीवर कर्जाचा डोंगर वाढत गेला. या प्रकरणात आतापर्यंत पाच लाख रुपयांपेक्षा अधिक फसवणूक झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

# ममता बॅनर्जींचे मंत्रिमंडळ बरखास्त

## नव्या सरकारचा शपथविधी शनिवारी होणार

कोलकता (वृत्तसंस्था)

ममता बॅनर्जी यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. आमचे सरकार बरखास्त करा पण मी राजीनामा देणार नाही, असा आक्रमक पवित्रा ममता बॅनर्जी यांनी घेतला होता. या सत्तासंघर्षांनंतर अखेर बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी पश्चिम बंगाल मंत्रिमंडळ बरखास्त केल्याची माहिती समोर आली आहे. या घडामोडींमुळे राज्यात मोठा घटनात्मक आणि राजकीय पेच निर्माण झाला असून, संपूर्ण देशाचे लक्ष आता पश्चिम बंगालमधील सत्तांतराकडे लागले आहे.तृणमूल काँग्रेस प्रमुख ममता बॅनर्जी यांनी निवडणुकीचा निकाल हा जनादेश नसून कट असल्याचा आरोप करत राजीनामा देण्यास स्पष्ट नकार दिला. इतकेच नव्हे तर, तृणमूल काँग्रेसचा पराभव जनतेच्या कौलामुळे नसून निवडणूक प्रक्रियेत झालेल्या कथित गैरप्रकारांमुळे झाला आहे. माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आम्ही भाजपशी नव्हे, तर भाजपसाठी काम करणाऱ्या निवडणूक आयोगाशी लढलो. बंगाच्या निवडणुकीत सुमारे १०० जागांवर मतदान प्रक्रियेत गडबड झाल्याचा आरोपही केला. पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रीय स्तरावर विरोधी आघाडी मजबूत करण्यासाठी काम करण्याची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी त्यांच्याशी संपर्क साधून पाठिंबा दर्शवला आहे. त्या म्हणाल्या, मी आता सामान्य नागरिक म्हणून लढणार आहे. मी रस्त्यावर उतरून अन्यायाविरोधात आंदोलन करेन. कोलकाता येथील ब्रिगेड परेड मैदान येथे ९ मे रोजी शपथविधी सोहळा होण्याची शक्यता असून, त्यासाठी मोठी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येणार असल्याची माहिती आहे.

# शेत/ पाणंद रस्त्यांना प्राधान्य देऊन ग्रामीण रोजगाराला गती द्यावी - भरत गोगावले



मुंबई (वृत्तसंस्था)

रोजगार हमी योजना विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देऊन तसेच या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन ग्रामीण रोजगाराला गती देण्याचे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा आणि ग्रामविकासाला गती देण्याच्या दृष्टीने मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विभागीय आढावा बैठक घेण्यात आली. मंत्री भरत गोगावले यांनी विविध जिल्ह्यांतील रोजगार हमी योजनेच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करत सध्या सुरू असलेल्या मनरेगा व मातोश्री ग्राम समृद्धी योजनेंतर्गत कामांचा जिल्हानिहाय आढावा घेतला. यामध्ये रोजगार हमी योजनेतील नोंदणीकृत मजुरांची संख्या, प्रत्यक्ष सुरू असलेली कामे, प्रलंबित मंजुरी, निधी वापर, तसेच शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांबाबतची सद्यस्थिती यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना मंत्री भरत गोगावले म्हणाले, केंद्र शासनाने व्ही.बी.जी राम जी अधिनियम २०२५ पारित केला असला तरी सदर अधिनियम अद्याप अंमलात आलेला नसून मनरेगा योजना पूर्ववत सुरू आहे. त्यामुळे विद्यमान कार्यपद्धतीनुसार सर्व कामे वेळेत आणि नियमबद्ध पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच केंद्र शासनाकडून मनरेगा कामांसाठी कोणतीही अंतिम कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेत/ पाणंद रस्त्यांची कामे ही राज्य शासनाची प्राधान्याची योजना असल्याचे सांगत मंत्री भरत गोगावले यांनी या कामांमध्ये अधिक गतिमानता आणण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या मागण्या आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात शेत/ पाणंद रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. क्षेत्रीय स्तरावर या कामांच्या अंमलबजावणीस गती द्यावी, असे त्यांनी सांगितले. मंजूर कामांची अंदाजपत्रके तातडीने तयार करून त्यांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तसेच संबंधित कामांचे वर्ककोड तत्काळ तयार करून कार्यारंभ आदेशासह हजेरीपत्रके निर्गमित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सुरू असलेल्या कामांची उर्वरित हजेरीपत्रके देखील त्वरित निर्गमित करून कामांचे मोजमाप घेऊन देयके नरेगासॉफ्ट प्रणालीवर विनाविलंब नोंदविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.












# संवेदनशील शिक्षकाच्या प्रगल्भ लेखणीतून उमटलेले : 'अनुभवाचे अंतरंग..'!

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

नुकतेच 'अनुभवाचे अंतरंग' हा अशोक शेटे लिखित कथासंग्रह वाचनात आला. 'चपराक प्रकाशन' संस्थेने तो प्रकाशित केला. हा कथासंग्रह दर्जेदार झाला असून, आकर्षक मुखपृष्ठ वाचकाचे लक्ष वेधून घेते. एकूण २७ कथा व १०४ पानांत हा कथासंग्रह नेटका झाल्याचे दिसून येते. जीवनानुभवाने परिपक्व आणि सत्यकथांनीयुक्त हे पुस्तक मला अतिशय आनंद देऊन गेले. पुस्तक हातात घेतल्यापासून ते संपेपर्यंत वाचतच राहावे, अशा कथा या संग्रहात आहेत. तसं पाहिलं, तर कोणतेही पान उघडावे, कथा वाचावी नि रसास्वाद घ्यावा, असे या पुस्तकाचे स्वरूप आहे. सर्वच कथा मोजक्या शब्दांत व सोप्या भाषेत असल्याने सामान्य वाचकाच्या मनाचा ठाव घेतात.

पुस्तकातील पहिली कथा 'उपक्रमाचा किडा' वाचूनच वाचक पुढील कथा वाचनाच्या मोहात पडतो. एका उपक्रमशील शिक्षकाची धडपड, संवेदनशील माणूस म्हणून जडणघडण, अनेक कथांमधून डोकावताना दिसते. विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या विकासासाठी प्रयत्न करताना वैयक्तिक आयुष्यात कसे अडचणीत यावे लागते, याची गोष्ट सांगणारी पहिलीच कथा मनाला भावते. कथांची मांडणी ही अतिशय जिवंत अनुभव देते.

कथेतील प्रसंग, पात्रे, अनुभव हे प्रत्यक्ष अनुभवलेले असले, तरी त्यास चिंतन व स्वतःच्या संवेदनशील दृष्टीकोनाचा स्पर्श लाभल्यामुळे अधिक लोभस व प्रेरणादायी झाले आहेत. कथेतील पात्रे ही शिक्षक व त्याच्या दैनंदिन अनुभवाशी जोडलेले असल्या कारणाने शिक्षक, विद्यार्थी व समाज यांतील आंतरक्रियेचे प्रतीक बनून समोर येतात. शिक्षकाचे भावविश्व, त्याची भावनिक ओढाताण, समाजाप्रति असणारे ऋण, बांधिलकी, याचाही उहापोह अशोक शेटे अनेक कथांमधून करताना दिसतात. प्रत्येक गोष्ट संपताना एक संदेश देऊन जाते. यातून त्यांची जीवनदृष्टी अधोरेखित होते.

'पुस्तक नव्हतं म्हणून' चा कथेचा शेवट करणाऱ्या या ओळी - छडीने हातावर ओरखडे पडतात, पण समजुतीने भविष्यातील पानं लिहिली जातात. या ओळी वाचताना प्रत्येक शिक्षक अंतर्मुख झाल्याशिवाय राहणार नाही. त्यानंतर 'छडी आणि सत्य' या कथेतील, शिक्षकाने प्रश्न थांबवले, तर विचार मरतो आणि जिथे विचार मरतो, तिथे समाज अंध होतो, ह्या ओळी शिक्षकाचा विद्यार्थी - समाज घडणीत किती मोलाचा वाटा असतो, हे सत्य उलगडतात. 'छडी पडीकडचा धडा', 'चोरी' आणि 'माणुसकीचा झेंडा' या कथा शिक्षकातील माणूसही सतत घडत असतो, हे सत्य उद्धृत करतात. म्हणून वाचकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. 'संकल्प' कथेतला नायक सर्वच तरुण वर्गाला गावाच्या प्रगतीत योगदान करण्याचे व मातीचे ऋण फेडण्याचे आव्हान व प्रेरणा देतो. याशिवाय आदिवासी व मागास समाजातील बालविवाहाची समस्या व त्यामुळे होणारी अल्पवयीन मुलींची व त्यासोबत कुटुंबाची होणारी होरपळ शिक्षकांनाही हतबल करते. यावर ठोस उपाय व्हायला हवेत, हे सांगून जाते. अशा अनेक कथांमधून एक शिक्षक माणूस म्हणून घडताना व विद्यार्थ्यांना घडवताना दिसून येतो.

माणुसकी, सामंजस्य, समाजाचा मार्गदर्शक, चिंतनशील, स्वाभिमानी, हळहळ, समयसूचक, सत्यवादी - शिक्षकाच्या व माणसाच्या अशा अनेक पैलूंवर लेखक या कथांमधून प्रकाश टाकतो. 'फाशी' या कथेतील नायक सुहास हा शिक्षकांचे ताणतणाव व बिघडलेल्या मानसिकतेचा कसा बळी ठरतो, याचे समर्पक वर्णन लेखक करतो. त्याचप्रमाणे व्यवस्थेचा बळी ठरलेला 'पासपोर्ट' या कथेचा नायक रोहित हा, नियम हवेत, पण नियमांच्या आड लपलेली असूया नको. अधिकार हवेत, पण माज नाही, असं शेलक्या शब्दात व्यवस्थेच्या डोळ्यात अंजन घालतो. 'पुरस्कार' ही कथा तर पुरस्कारांमागची शोकांतिका रेखित करते. त्यामुळे कामात मग्न राहणे शिक्षक योग्य समजतात. पुरस्काराच्या मागे धावणाऱ्या आणि राजकारणामुळे कुचंबना सहन कराव्या लागणाऱ्या दोन्ही प्रकारच्या गुरुजनांसाठी ही कथा डोळ्यात अंजन घालणारी म्हणावी लागेल. याशिवाय 'साक्ष' ही कथा शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या अतिरिक्त कामांची साक्ष देते. 'मधमाशा साहेब .. येथे सी. आर. बदलून मिळतात' या कथा प्रत्येकाने अनुभवलेल्या वाटतात. अशा तऱ्हेने पहिलीच साहित्यकृती असूनही लेखक अशोक शेटे हे उत्तम कथाकार वाटतात. प्रसंगाला साजेसे वर्णन करण्यात ते तरबेज असल्याचे जाणवले. वेगवेगळ्या विषयावर लिहिताना त्यांनी पुनरावृत्ती होणार नाही, याचे पथ्य पाळले आहे. वाचकांच्या नक्कीच हा कथासंग्रह पसंतीस उतरेल, अशी मला खात्री वाटते.



**सौ. सुनिता जयराम घुले, संगमनेर**
**मो. नं. ८९७५२३४१४२**

# विठ्ठल नाम हेच भवसागरातून तारून नेणारे साधन : निर्मलनाथ महाराज

## जनता नगरमध्ये हरिनाम सप्ताहात भक्तिरसाची मेजवानी

**विठ्ठल नाम । सर्व साधनांचे सार।**
**भवसिंधू उतरी पार ।।**
**काय नव्हे केले एका चिंतिता विठ्ठले ।।१**
**सर्वसाधनांचे सार ।**
**भव सिंधू उतरी पार ।।२।।**
**योगयाग तपे। केली तयाने अमुपे ।।३।।**
**तुका म्हणे जपा। मंत्र त्री अक्षरी सोपा ।।४।।**

युवावार्ता (सदाशिव मुळे) -



संगमनेर - संगमनेर शहराच्या जनता नगर मध्ये सुरू असलेल्या हरिभक्त परायण बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे प्रेरणेने ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव सोहळ्यात किर्तन रुपी पहिले पुष्प गुंफताना आळंदी येथील गुरुवर्य निर्मलनाथ महाराज यांनी जगद्गूर संत तुकाराम महाराजांचा चार चरणाचा नाम चिंतनाचे महत्त्व विशद करणारा अभंग सेवेसाठी घेतला. या अभंगाचा सरळ अर्थ असा आहे की, एका विठ्ठल नाम चिंतन केले असता काय होत नाही? सर्व काही चिंतनाने प्राप्त होते. विठ्ठल चिंतन हे सर्व साधनांचे सार आहे. हे भवसागरातून तरुण नेते. त्याने असंख्य तपे व व्रते केल्याचे आणि याग करण्याचे पुण्य मिळते. संत तुकाराम महाराज म्हणतात म्हणून भक्तजन हो विठ्ठल नाम या तीन अक्षरी नाम जप तुम्ही श्रद्धेन करा. आपल्या चिंतनात हरिभक्त परायण निर्मलनाथ महाराज यांनी सांगितले की, नाम साधन म्हणजे परमेश्वराचा नावाचा जप स्मरण किंवा कीर्तन करणे. भक्ती मार्ग हा सर्वात सोपा राजमार्ग आहे. आणि प्रभावी साधन आहे.

**जनतानगर**
**अखंड हरीनाम सप्ताह**
**किर्तन महोत्सव सोहळा**
**जनतानगर, संगमनेर**



**दि. ०८/०५/२०२६ वेळ ४-५.३०**
**आदिशक्ती मुक्ताई व संत चोखामेळा संगीत चरित्र कथा**
**कथाकार - रामाणाचार्य ह.भ.प.तुषार महाराज कातळे**

**आजचे हरिकिर्तन ह. भ. प. बाळकृष्ण महाराज कर्पे**

**दि. ०९/०५/२०२६ ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगावकर**

यासाठी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे नाम संकीर्तन साधन पै सोपे जळतील पापे जन्मांतरीचे तसेच ज्ञानेश्वर माऊली यांच्या हरिपाठातील हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी असे अनेक प्रमाणे देऊन नामाचे महत्व विशद केले. कलयुगातील सोपे साधन म्हणजे नाम चिंतन होय. मनातील विकार, चिंता राग कमी होतो. नाम हे मनाला एकाग्र करणारे साधन आहे. नामाने मन स्वच्छ होते. अहंकाराचा नाश होतो. नाम घेताना आपण निमित्त मात्र आहोत ही जाणीव होते. यात मानव जातीचे कल्याण आहे. दु:खाची निवृत्ती होऊन खरा परमानंद प्राप्त होतो. सर्व चराचरात परमेश्वर परमात्मा भरलेला आहे म्हणजेच हे जग जेव्हा विष्णुमय वाटते तेव्हा खऱ्या अर्थाने भक्तीची पूर्तता होते. नामधारक मुक्त होतो. अंतकाळी जो भगवंताचे स्मरण करील तो भगवंताला जाऊन मिळतो असे श्रीकृष्णाने भगवद्गीतेत सांगितलेले आहे. नाम साधना करताना सातत्य राखा ,उठता -बसता, काम करताना नाम घ्या. नाम प्रेमाने आर्ततेने घ्या. निष्काम भक्ती करा . विणा सेवा हरिभक्त परायण उत्तमराव गांडोळे यांनी केली. सूत्रसंचालन हरिभक्त परायणपोपट महाराज आगलावे यांनी केले.

# शिकाऊ भरती मेळाव्याचे ११ मे रोजी आयोजन

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राष्ट्रीय शिकाऊ मेळाव्याअंतर्गत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरूडगाव रोड, अहिल्यानगर येथे ११ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या वेळेत शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिकाऊ उमेदवारी मिळवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य के. ए. जहागीरदार यांनी केले आहे.

मेळाव्याच्या ठिकाणी उमेदवारांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक अथवा क्यू. आर. कोडद्वारे नोंदणी करावी. तसेच दहावी व आयटीआय उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रके, शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड, आदी मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतींसह मेळाव्यास उपस्थित राहावे, असेही कळविण्यात आले आहे.

SUBSCRIBE YOUTUBE Daily Yuvavarta

# श्री कान्होबा देवस्थानात नित्य पूजा, महाआरती व होम-हवन भक्तिभावात

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ मानले जाते. ग्रामीण भागातील भक्तीभाव परंपरा आणि नाथसंप्रदायाची साधना यांचे सुंदर दर्शन येथे घडते.

या देवस्थानात हिंदू रितीरिवाजानुसार दररोज श्री कान्होबा देवाच्या समाधीची अत्यंत श्रद्धेने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध, हार, फुले अर्पण केली जातात. सकाळची आरती गणपती बाप्पा, दत्त महाराज, कान्होबा देव, नवनाथ आरती सकाळी ६ वाजता, तर सायंकाळची आरती सायंकाळी ७:३० वाजता होते. त्याचबरोबर गुरुवारी विशेष महाआरती होऊन, महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप केले जाते. ही परंपरा गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपली आहे.

देवस्थानातील सर्व पूजा सुकेवाडी गावातील ग्रामस्थांच्या सहभागातूनच पार पडते. देवस्थानासाठी गावकऱ्यांनी अधिकृत हिंदू पुजारी नेमले असून, आकाश शशिकांत सातपुते, सुकेवाडी, अशोक महादू खर्डे, सुकेवाडी, हे दोघेही नित्य पूजा व धार्मिक विधी पार पाडत आहेत.

नित्य पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू व खर्च दररोजच्या पूजेसाठी हार, कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस, वाती, भस्म, खडीसाखर, अशा विविध वस्तूंचा वापर केला जातो. मे २०२६ महिन्यातील ३१ दिवसांसाठी या सर्व वस्तूंचा एकूण खर्च सुमारे ३००० रुपये इतका झाला असून, हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी उल्हास सोमनाथ गुंजाळ, दीपक बाळासाहेब वामन, अजित शिवराम शेटे, विनायक



रामनाथ सातपुते, देव संतोष शिंदे, सुकेवाडी, यांनी वस्तू स्वरूपाने उचलला आहे.

दर पौर्णिमेला देवस्थानात होम - हवनाचे आयोजन केले जाते. या होमासाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुगळे, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले, फळे, आदी वस्तूंचा समावेश होतो. या सर्वांचा एकूण खर्च सुमारे ४००० रुपये असून, हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी नितीन भाऊराव गोळे, रवी सोमनाथ सातपुते, नामदेव कारभारी साळवे, संतोष रामनाथ वाकचौरे यांनी वस्तू स्वरूपाने केला आहे.

सुकेवाडीतील हे नाथ सिद्धपीठ केवळ धार्मिक स्थळ नसून, गावकऱ्यांच्या एकोप्याचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. नित्य पूजा, पौर्णिमेचे होम - हवन, गुरुवारची महाआरती आणि महाप्रसाद, या माध्यमातून येथे भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवली जात आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कळस ग्रामपंचायतीची पाहणी

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत सहभागी ग्रामपंचायतींच्या तपासणीसाठी हिंगोली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी माया वानखडे यांच्या अध्यक्षतेखालील पथकाकडून अकोले तालुक्यातील कळस ग्रामपंचायतीची तपासणी करण्यात आली. या पथकात हिंगोली पंचायत समितीचे विस्तार अधिकारी डी. डी. घुगे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे हिंगोली जिल्हाध्यक्ष तथा दैनिक गांवकरीचे जिल्हा प्रतिनिधी गजानन मगर, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी मनरेगा रोहयो निलेश राठोर, यांचा सहभाग आहे. यावेळी अकोले पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी रमेश मुठे, विस्तार अधिकारी विजय धाकतोडे, नंदराम पवार, आदी उपस्थित होते.



कळस ग्रामपंचायतीचे कार्यालय, कळस जिल्हा प्राथमिक शाळा, अंगणवाडी, पशुवैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, तलाठी कार्यालय, स्मशानभूमी, आदी ठिकाणी भेटी दिल्या. कळसेश्वर देवस्थानचा परिसर पाहून पथक भारावून गेले. पू. पू. सुभाषपूरी महाराज यांनी या देवस्थानचा विकास कुठलीही शासकीय मदत न घेता लोकवर्गणीतून केलेला पाहून आश्चर्य व्यक्त केले. जिल्हा परिषद शाळेतील कॉम्प्युटर व विज्ञान लॅब पाहूनही समाधान व्यक्त केले. शाळेच्या पटसंख्येबाबत आनंद व्यक्त केला. गावातील ग्रामस्थ, पदाधिकारी यांचा एकोपा व सलोखा, या बाबत त्यांना आश्चर्य वाटले. गावातील व मंदिर परिसरात असलेली स्वच्छता, याचेही कौतुक केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान (२०२५-२६) हे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाचे एक महत्त्वाकांक्षी पाऊल आहे, ज्याचा उद्देश ग्रामपंचायती सक्षम करून शाश्वत ग्रामीण विकास साधणे हा आहे. हे अभियान सुशासन, पाणी व्यवस्थापन, जनसहभाग आणि डिजिटल साक्षरतेवर भर देत असून, प्रत्येक गाव समृद्ध झाले तर राज्यही समृद्ध होईल, या उद्देशाने राज्य शासनाने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला असून, हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीपर्यंत राबविले गेले आहे. या अभियानात सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा, अशा विविध घटकांवर त्या त्या ग्रामपंचायतीला गुण मिळणार आहेत.

यावेळी सरपंच राजेंद्र गवांदे, माजी सरपंच तथा सोसायटीचे चेअरमन विनय वाकचौरे, माजी सरपंच तथा जयकिसान दूध संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब वाकचौरे, पोलीस पाटील, देवस्थानचे सचिव गोपीनाथ ढगे, ग्रामपंचायत सदस्य जिजाबा वाकचौरे, दत्तात्रय वाकचौरे, माजी उपसरपंच दिलीप ढगे, माजी ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब वाकचौरे, आदी उपस्थित होते.

यावेळी ग्रामसेवक ज्ञानेश्वर सुर्वे, कामगार तलाठी सुरेखा कानवडे, वैद्यकीय अधिकारी रिद्धी जाधव, मुख्याध्यापक तान्हाजी वाजे, पशुधन अधिकारी रविंद्र घोडके, आशा गतप्रवर्तक भारती गायकवाड, आरोग्य सेविका पुष्पा मेंगाळ, आरोग्य सेवक अजित कदम, अंगणवाडी सेविका मालती गोसावी, आशा ढगे, मनीषा वाकचौरे, संगीता वैराट, आशा सेविका सुनीता गवांदे, तनुजा हासे, योगिता चव्हाण, ग्रामपंचायत कर्मचारी संजय सोनवणे, माधव वाकचौरे, शंकर वाघमारे, आदींनी आपली माहिती सादर केली.

# नवीन मराठी शाळेचा दहावी परीक्षेत निकालाची परंपरा कायम

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथील नवीन मराठी शाळेचा इयत्ता दहावी बोर्डाचा निकाल ८९.२०/टक्के लागला आहे. प्रथम विद्यार्थ्यांनी सय्यद उन्मेयनी असिफ हिला ८२.४०/टक्के मार्क पडून ती प्रथम आली आहे. द्वितीय क्रमांक शेलकर शरयू पंकज हिला ७५.८०/टक्के मार्क पडले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे नवीन मराठी शाळा मंडळाचे अध्यक्ष श्री मिलिंद सराफ, सेक्रेटरी श्री अनिरुद्ध उपासनी, मुख्याध्यापक श्री शेरमाळे सर, प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका श्रीमती भालेराव मॅडम , संचालक डॉक्टर नैमिष सराफ, ज्येष्ठ संचालक प्राध्यापक शशांक गंधे, संचालक माजी प्राचार्य श्री मुकुंद डांगे सर, संचालक श्री संदीप शेठ मुळे, वरिष्ठ लिपिक श्री कुलकर्णी सर, शिक्षकेतर कर्मचारी सेवक वर्ग यांनी अभिनंदन केले आहे. शाळेमध्ये सर्वसामान्य मुलांना प्रवेश देऊन मुख्याध्यापक, शिक्षकांनी अतिशय मेहनत घेऊन इयत्ता दहावीचा निकाल खूप चांगला लावला आहे. त्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# दलित -हरिजन वस्तीचे नामांतर करा -संदेश गायकवाड यांची मागणी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील सायखिंडी गावातील 'दलित-हरिजन वस्ती'चे नामांतर; 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर' व 'माता रमाई नगर' नावासाठी ग्रामपंचायतीकडे अर्जद्वारे मागणी केली आहे. महायुतीचे संदेश सुखदेव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने हे निवेदन दिले. 'दलित' व 'हरिजन' या शब्दांमुळे वस्तीतील नागरिकांच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचते. शासनाच्या धोरणानुसार हे शब्द वापरणे टाळावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आहे



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांचे नाव वस्तीला दिल्यास भावी पिढीला प्रेरणा मिळेल, असे निवेदनात म्हटले आहे. या नामांतरणामुळे गावाच्या सामाजिक एकोप्याला बळकटी मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

हे निवेदन ग्रामसेवक श्रीमती भागवत मॅडम यांनी स्वीकारले. पुढील ग्रामसभेत हा विषय मंजुरीसाठी ठेवला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिवसेना महायुतीचे कार्यकर्ते संदेश भाऊ गायकवाड, अशोकराव नन्नवरे , कैलास भाऊ जेडगुले आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# संपादकीय...

## ओस पडती शाळा

गाव हे भारतीय संस्कृतीचे मूळ मानले जाते आणि शिक्षण हे त्या गावाच्या प्रगतीचे सर्वात मोठे साधन समजले जाते. एकेकाळी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर, गावाच्या सामाजिक जीवनाचे केंद्र आणि अनेक पिढ्यांच्या स्वप्नांना आकार देणारी संस्था होती. सकाळी घंटा वाजताच शाळेकडे धावणारी मुले, अंगणात भरलेला प्रार्थनेचा स्वर, शिक्षकांच्या आवाजाने गजबजलेल्या वर्गखोल्या आणि खेळाच्या मैदानात उसळणारा आनंद हा गावाच्या जिवंतपणाचा भाग होता. परंतु गेल्या काही वर्षांत ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक शाळांचे चित्र झपाट्याने बदलत आहे. विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे, काही शाळा पटसंख्येअभावी बंद होण्याच्या मार्गावर आहेत, तर काही ठिकाणी एकच शिक्षक संपूर्ण शाळा चालवत आहे. गावाकडील शाळांमधील घटती विद्यार्थी संख्या हा केवळ शिक्षण विभागाचा प्रश्न राहिलेला नाही, तर तो ग्रामीण समाजरचना, आर्थिक बदल, स्थलांतर, बदलती मानसिकता आणि सरकारी धोरणांशी जोडलेले गंभीर सामाजिक आव्हान बनले आहे. शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मूलभूत साधन असताना ग्रामीण भागातील शाळा रिकाम्या होणे ही चिंतेची बाब आहे. या परिस्थितीकडे केवळ आकडेवारी म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील पालकांमध्ये सरकारी शाळांबद्दलचा विश्वास कमी होणे हे यामागील प्रमुख कारण मानले जाते. पूर्वी जिल्हा परिषद शाळांमधूनच अधिकारी, शिक्षक, डॉक्टर, अभियंते, सैनिक आणि समाजनेते घडले; मात्र कालांतराने इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांचा प्रभाव वाढू लागला. शहरांमध्ये सुरू झालेल्या इंग्रजी शाळांनी हळूहळू ग्रामीण भागातही पाय पसरवले आणि इंग्रजी म्हणजेच प्रगती अशी मानसिकता निर्माण झाली. परिणामी, गरीब कुटुंबही आर्थिक ताण सहन करून मुलांना खासगी शाळेत पाठवण्याचा प्रयत्न करू लागले. अनेक पालकांना सरकारी शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा कमी झाल्याची भावना निर्माण झाली. काही ठिकाणी शिक्षकांची कमतरता, शैक्षणिक साधनांची अपुरी उपलब्धता, तांत्रिक सुविधांचा अभाव आणि अधूनमधून दिसणारी निष्क्रियता यामुळे सरकारी शाळांची प्रतिमा कमकुवत झाली. ज्या गावांमध्ये पूर्वी दोनशे-तीनशे विद्यार्थी असायचे, त्या शाळांमध्ये आज वीस-पंचवीस विद्यार्थी उरले आहेत. अनेक गावांमध्ये पहिली ते चौथी किंवा पहिली ते सातवीपर्यंतच्या वर्गांमध्ये मिळून दहा ते पंधरा विद्यार्थी असल्याची परिस्थिती आहे. या घटत्या पटसंख्येमुळे सरकारकडून शाळा एकत्रीकरणाचे निर्णय घेतले जात आहेत. प्रशासनाच्या दृष्टीने हा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य उपाय वाटत असला, तरी प्रत्यक्षात तो ग्रामीण शिक्षणाच्या मुळावर घाव घालणारा ठरत आहे. कारण एखादी शाळा बंद झाली की त्या गावाचा सामाजिक केंद्रबिंदूच हरवतो. लहान मुलांना दुसऱ्या गावात जावे लागते, वाहतुकीच्या अडचणी निर्माण होतात आणि अनेक वेळा शिक्षणापासून मुलांचा संपर्क तुटतो. विशेषतः मुलींच्या शिक्षणावर याचा मोठा परिणाम होतो. काही पालक दूरच्या गावात मुलींना पाठवण्यास घाबरतात आणि त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर हेही विद्यार्थी संख्या घटण्यामागील मोठे कारण आहे. रोजगार, व्यवसाय, उद्योग, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात कुटुंबे शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. शेतीतील अनिश्चित उत्पन्न, दुष्काळ, पाण्याची टंचाई आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे गावातील तरुण कुटुंबे शहरांमध्ये स्थायिक होण्याचा निर्णय घेतात. परिणामी गावात वृद्ध आणि शेती करणारी काही कुटुंबे उरतात. विद्यार्थ्यांची संख्या कमी होत जाते आणि शाळा ओस पडतात. अनेक गावांमध्ये तर बालकांची संख्या इतकी कमी झाली आहे की शाळा चालवणेच कठीण झाले आहे. यामागे ग्रामीण भागातील घटता जन्मदर हेही एक वास्तव आहे. पूर्वी मोठी कुटुंबे असायची; आज कुटुंब नियोजनामुळे दोन किंवा एकाच मुलावर कुटुंब थांबते. त्यामुळे नैसर्गिकरीत्या शाळेतील पटसंख्या घटत आहे. परंतु या वास्तवाला समजून घेऊन शिक्षण व्यवस्थेने स्वतःमध्ये बदल करण्याऐवजी केवळ शाळा बंद करणे हा उपाय स्वीकारला, तर ग्रामीण शिक्षणाचा पाया अधिक कमकुवत होईल. शिक्षण क्षेत्रातील बदलत्या अपेक्षाही या समस्येला कारणीभूत आहेत. आज पालकांना केवळ पाठ्यपुस्तकांचे शिक्षण नको आहे, तर इंग्रजी भाषा, संगणक शिक्षण, डिजिटल वर्ग, स्पर्धा परीक्षा तयारी, व्यक्तिमत्त्व विकास, क्रीडा, कला आणि आधुनिक कौशल्ये हवी आहेत. ग्रामीण शाळा या बदलत्या अपेक्षांशी जुळवून घेण्यात अनेकदा मागे पडतात. काही शिक्षक प्रामाणिकपणे काम करत असले, तरी संपूर्ण व्यवस्थेत आवश्यक ते आधुनिकीकरण झालेले नाही.

# अपर कोषागार अधिकारी कुशाबा पिसे सेवानिवृत्त

## कोषागार कार्यालयात निरोप समारंभ



**अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)** – जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगर येथील अपर कोषागार अधिकारी कुशाबा पिसे, ३० एप्रिल २०२६ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबद्दल, कोषागार कार्यालयात आयोजित एका विशेष समारंभात त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. प्रामाणिक, कर्तव्यदक्ष व नेतृत्वगुणसंपन्न अधिकारी म्हणून त्यांनी विविध विभागांत उल्लेखनीय सेवा बजावली.

श्री. पिसे यांनी जळगाव, अमळनेर, धुळे, अकोले, संगमनेर, कर्जत तसेच समाजकल्याण कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे विविध पदांवर कार्यरत राहून प्रशासकीय कामकाजात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी नाशिक विभागात मुख्यमंत्री १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम यशस्वीपणे राबवून तांत्रिक विभागात तृतीय क्रमांकाचे पारितोषिकही प्राप्त केले होते.

या निरोप समारंभात श्री. पिसे यांना सेवापूर्तीबद्दल गौरविण्यात आले. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, प्राचार्य भास्कर शितोळे, यांच्यासह वित्त विभागातील अधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते. समारंभात उपस्थितांनी श्री. पिसे यांच्या कार्यशैलीचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)** – अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पहिलीच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी दि. २९ मे २०२६ पर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी मनोजकुमार पैठणकर यांनी केले आहे.

योजनेच्या लाभासाठी विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक असून, पालकांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न कमाल १ लाख रुपये असावे. प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे वय दि. ३१ डिसेंबर २०२६ रोजी ६ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्याचा जन्म दि. १ जुलै २०१९ ते दि. ३१ डिसेंबर २०२० या कालावधीत झालेला असावा.

विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेत विधवा, घटस्फोटित, निराधार किंवा परित्यक्ता महिला पालकांच्या पाल्यांना, तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रवेशानंतर इयत्ता बारावीपर्यंत शाळा बदलून मिळणार नाही. शासनाकडून विद्यार्थी क्षमता मंजूर झाल्यानंतरच विद्यार्थ्यांची योजनेंतर्गत निवड केली जाईल.

अर्जासोबत विद्यार्थ्याचा जन्मदाखला, जातीचे प्रमाणपत्र, पालकांचा उत्पन्नाचा दाखला, विद्यार्थ्याचे आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, वैद्यकीय प्रमाणपत्र, रेशन कार्ड, पासपोर्ट आकाराचे फोटो, पालक दारिद्र्यरेषेखालील असल्यास ग्रामसेवकाचा दाखला, महिला पालक विधवा, घटस्फोटित, निराधार, परित्यक्त्या असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र, आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

योजनेअंतर्गत प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह परिपूर्ण अर्ज, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर येथे मुदतीत दाखल करावेत. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४२४-२५१०३७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# ज्ञानमाता ज्युनिअर कॉलेजचा निकाल यंदाही अव्वल




**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)** – ज्ञानमाता विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता १२ वी एच. एस. सी. मार्च २०२५-२६ परीक्षेचा निकाल उल्लेखनीय लागला असून, सर्व शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल ९९.५४ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेत शेख मसिरा गफ्फार हिने ८२.८३ टक्के गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक मिळविला, तसेच शेख अनम निसार हिने ७६.५० टक्के गुणांसह द्वितीय, तर पठाण सन्नय्या शौकत हिने ७५.८३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

वाणिज्य शाखेतील हलवर सृष्टी सोपान हिने ८४.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला, तर शेरमाळे श्रुतिका पोपट हिने ८०.०५ टक्के गुणांसह द्वितीय, तर थेटे यश मणिराम याने ७९.०५ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

कला शाखेत जोंधळे समीक्षा नानासाहेब हिने ७६.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. खरात प्रणाली हरिभाऊ हिने ६६.६७ टक्के गुणांसह द्वितीय, तर इनामदार मरिया तनवीर हिने ६५.०५ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

शाखानिहाय निकालात विज्ञान शाखेचा निकाल ९९.३६ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के आणि कला शाखेचा निकालही १०० टक्के लागला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व्यवस्थापन, तसेच प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर, उपप्राचार्या अर्चना डोंगरे, पर्यवेक्षक फादर प्रशांत, शारदा नवले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.


युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाहिजेत

अकाऊंटंट | जागा ०२



टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची

**CHANGE IN NAME**

I TAUSEEF KHANMOHMMAD SHAIKH
HAVE CHANGED MY OLD NAME
TAUSIF KHAN MOHAMAD SHAIKH
TO NEW NAME AS
TAUSEEF KHANMOHMMAD SHAIKH
ADDRESS - JAMA MASJID JAWAL, NAIKWADPURA, SANGAMNER, DIST - AHILYANAGAR (MH) PIN 422605

READ E- NEWS ON Yuvavarta.in

**त्वरित पाहिजेत**

ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व प्रॉपर्टी व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे

9421911671




**नोकरीची संधी..!**

संगमनेर येथील मालपाणी उद्योग समूहाकरिता

MALPANI

**पाहिजेत!**

सिक्युरिटी गार्ड - पदे 4

गनमॅन - पद 1
(Retired Army Person with Valid Gun License)

- शैक्षणिक पात्रता -
किमान 10वी / 12वी उत्तीर्ण
• संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक अनुभव.
• संबंधित क्षेत्रातील **अनुभव असल्यास प्राधान्य** दिले जाईल.
**वयोमर्यादा** - कमाल 35 वर्षे

इच्छुक उमेदवारांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसांच्या आत ऑफिसच्या वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधावा.

• संपर्क: **मालपाणी इस्टेट**, अकोले रोड, कासारादुमाला, संगमनेर- 422605, जि.अहिल्यानगर
**मो.** 8484891804 **इमेल**- jobs@gmail.com

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४ | डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

• आवश्यकता आहे •

**क्रशर सुपरवायझर पाहिजे**
(Crusher Supervisor)

- क्रशर प्लांटचे कामकाज पाहणे व सर्व ऑपरेटरवर देखरेख ठेवणे.
- मशीन चालू ठेवणे, प्रॉडक्शन व गुणवत्ता (Quality) यांची जबाबदारी.
- मेंटेनन्स, साहित्य साठा व दैनिक नोंदी (Records) पाहणे.
- सुपरविजनचा अनुभव आवश्यक.

संपर्क (Stone Crusher) 8208878391 | संपर्क (Office) 9822684402

NKG Engineers & Govt Contractor | कार्यालय पत्ता: श्रीकांत देशमुख हॉस्पिटल शेजारी, N K Gade Building, First Floor, शिवाजीनगर, संगमनेर | कामाचे ठिकाण: Crusher Kauthe Kamleshwar

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**

शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक-पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

**पाहिजेत**

वामनराव इथापे बी.एच.एम.एस. कॉलेजकरिता खालील पदे भरणे आहे
अकौंटंट – ०२ जागा
पात्रता – बी.कॉम/ एम. कॉम
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२ जागा, पात्रता – बी. कॉम
एल.एम. व्ही. वाहन चालक – ०३ जागा, अनुभवी
वॉचमन – ०३ जागा
पत्ता– डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
संपर्क - 9370071777
9518556933, 9822791484

**ड्रायव्हर पाहिजे**

ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**पाहिजेत**

Venkatesh

सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे

- टेलीकॉलिंग — 10 जागा
  फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार
  (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
- प्रोडक्शन लाइन — 10 जागा
  पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
- Dispatch सुपरवाइझर — 02 जागा
  (कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य )
- ड्रायवर - पगार- १५ हजार — 05 जागा
  (ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)

अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00

**सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज**
संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A , संगमनेर, जि. अ.नगर
9699363221

**टेंडर नोटीस**

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँकेस त्यांच्या नव्याने उघडणाऱ्या शाखांचे फर्निचर तसेच ए.टी.एम. सेंटरचे फर्निचर व साकूर फाटा (इगतपूरी) शाखेचे बांधकाम दुरुस्ती करावयाची आहे. त्यासाठी बँकेच्या वेबसाईटवर टेंटरसबंधीत सर्व कागदपत्रे उपलब्ध केलेली आहेत. सबंधीत कंत्राटदारांनी बँकेच्या साईटवरून टेंडर डाऊनलोड करावे आणि आपल्या कागदपत्रांसह व बोलीसह बँकेच्या कार्यालयात दिनांक १६/०५/२०२६ पर्यंत मा. चेअरमन सो/ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष टेंडर निविदा जमा करावी.

वेबसाईटचा पत्ता
www.smbt.bank.in

**पाहिजेत**

मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल अँड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर
9657230023

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# व्हीएसआय आणि ऑस्ट्रेलियन संशोधन संस्थांमध्ये तांत्रिक सहकार्य : माजी मंत्री थोरात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–

महाराष्ट्रातील ऊस शेती आणि साखर उद्योग अधिक आधुनिक, संशोधनाधारित व जागतिक स्पर्धात्मक बनविण्याच्या उद्देशाने पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट च्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने ऑस्ट्रेलियातील विविध जागतिक दर्जाच्या ऊस संशोधन संस्था, प्रगत प्रयोगशाळा, फिनॉमिक्स केंद्रे, स्पीड ब्रीडिंग सुविधा तसेच आधुनिक साखर कारखान्यांना भेट देत सविस्तर अभ्यास दौरा केला. या शिष्टमंडळामध्ये माजी मंत्री तथा व्हीएसआय नियामक मंडळ सदस्य बाळासाहेब थोरात, मा. राजेश टोपे, यांच्यासह पीक उत्पादन व संरक्षण विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग, ऊस प्रजनन विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुशीर कपिल आणि रेणूजीवशास्त्र व जनुकीय अभियांत्रिकी विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अशोक जगताप यांचा समावेश होता.

दौर्यादरम्यान शिष्टमंडळाने 'शुगर रिसर्च ऑस्ट्रेलिया'च्या अत्याधुनिक 'आयरिस' प्रयोगशाळेला भेट दिली. या प्रयोगशाळेमध्ये ऊस जीनोमिक्स, रोग निदान, टिश्यू कल्चर, साइटोजेनेटिक्स, कीड व रोग व्यवस्थापन तसेच मृदा आणि पोषण विश्लेषणासंदर्भातील आधुनिक संशोधन सुविधा उपलब्ध असून, ऊस उद्योगासाठी वेगवान आणि अचूक संशोधन कार्य येथे केले जाते. तसेच 'द युनिव्हर्सिटी ऑफ क्वीन्सलँड' येथील स्पीड ब्रीडिंग सुविधेची पाहणी करण्यात आली. नियंत्रित तापमान, कृत्रिम प्रकाश व्यवस्था आणि आधुनिक नियंत्रित वातावरण तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी कालावधीत नवीन ऊस व इतर पिकांच्या जाती विकसित करण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास शिष्टमंडळाने केला. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर अधिक उत्पादनक्षम आणि प्रतिकारक्षम वाण विकसित करण्यासाठी हे तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

शिष्टमंडळाने 'शुगर रिसर्च ऑस्ट्रेलिया' अंतर्गत कार्यरत प्रसिद्ध फोटोपीरियड सुविधा आणि हायड्रोपोनिक्स संशोधन केंद्रालाही भेट दिली. कृत्रिम प्रकाश नियंत्रणाद्वारे ऊसात फुलोरा प्रेरित करण्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यात आला. विविध देशांतील ऊस प्रजनन कार्यक्रमांसाठी मेरिंगा केंद्राला विशेष महत्त्व असून, येथे विकसित होणारे संशोधन जागतिक स्तरावर उपयोगी ठरत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. ड्रोन, सेन्सर, इमेजिंग प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्सच्या साहाय्याने पिकांची वाढ, दुष्काळ सहनशीलता, पोषण कार्यक्षमता आणि उत्पादन क्षमता यांचे अचूक विश्लेषण कसे केले जाते, याचा अभ्यास शिष्टमंडळाने केला.

ऑस्ट्रेलियातील आधुनिक साखर कारखान्यांनाही भेट देत ऊस गाळप, ऊर्जा निर्मिती, बॅगॅसचा पुनर्वापर, स्वयंचलित मिल व्यवस्थापन, कार्यक्षम प्रोसेसिंग आणि शाश्वत साखर उत्पादन पद्धतींचा सखोल अभ्यास करण्यात आला. ऑस्ट्रेलियातील साखर उद्योगामध्ये उत्पादकता, गुणवत्ता आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाला विशेष प्राधान्य दिले जात असल्याचे थोरात यांनी सांगितले. या अभ्यास दौर्यामुळे महाराष्ट्रातील ऊस शेतीमध्ये आधुनिक जैवतंत्रज्ञान, स्पीड ब्रीडिंग, फिनॉमिक्स, रोग व्यवस्थापन आणि हवामान बदलास प्रतिकारक्षम ऊस जाती विकासासाठी नवे तंत्रज्ञान उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. भविष्यात व्हीएसआय आणि ऑस्ट्रेलियातील संशोधन संस्थांमध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प, विद्यार्थी व शास्त्रज्ञ देवाणघेवाण तसेच तांत्रिक सहकार्याचे नवे मार्ग खुले होतील, असा विश्वास माजी मंत्री थोरात यांनी व्यक्त केला.

# राज्यपालांची मनमानी, टीव्हीकेचे सर्व आमदार राजीनामा देणार?



चेन्नई (वार्ताहर)-

तमिळनाडूच्या राजकारणातून मोठी घडामोड समोर येत आहे. टीव्हीके पक्षाने मोठा राजकीय निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. डीएमके किंवा एआयएडीएमके यांनी सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केल्यास, टीव्हीकेचे सर्व १०८ आमदार राजीनामे देतील, असा दावा सूत्रांनी केला आहे. या घडामोडींमुळे तमिळनाडूच्या सत्तासमीकरणात मोठी राजकीय अनिश्चितता निर्माण झाली असून, पुढील काही तास तमिळनाडूच्या राजकारणासाठी महत्त्वाचे मानले जात आहेत.

विजय थलपती यांच्या टीव्हीके पक्षाने तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक १०८ जागा जिंकल्या असल्या, तरी त्यांना बहुमताचा आकडा गाठता आलेला नाही. तमिळनाडूच्या २३४ जागांच्या विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी ११८ च्या संख्याबळाची गरज आहे. काँग्रेसच्या पाच आमदारांनी टीव्हीकेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे या दोघांचे एकत्रित संख्याबळ ११३ इतके झाले आहे. विजय थलपती दोन मतदारसंघातून निवडून आल्यामुळे टीव्हीकेचे प्रत्यक्ष संख्याबळ १०७ इतकेच मोजले जाईल. त्यामुळे टीव्हीके आणि काँग्रेस आघाडीचे एकत्रित संख्याबळ ११२ इतकेच भरते. त्यामुळे बहुमतासाठी त्यांना आणखी सहा आमदारांच्या पाठिंब्याची गरज आहे.

गेल्या दोन दिवसांपासून थलपती विजय यांच्या पक्षाकडून सत्तास्थापनेसाठी प्रयत्न सुरू आहेत. थलपती विजय यांनी आतापर्यंत दोनवेळा तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांची भेट घेतली आहे. मात्र, दोन्हीवेळा त्यांना, आधी ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणा, तरच मी तुम्हाला सत्तास्थापनेचे निमंत्रण देतो, अशी भूमिका घेतली आहे. एरवी राज्यपाल निवडणुकीत सर्वाधिक जागा मिळालेल्या पक्षाला सत्तास्थापनेसाठी निमंत्रण देतात आणि नंतर संबंधित पक्षाला विधानसभेत बहुमत सिद्ध करावे लागते. मात्र, तमिळनाडूच्या राज्यपालांनी घेतलेल्या वेगळ्या भूमिकेमुळे तमिळनाडूत सत्तास्थापनेचा तिढा निर्माण झाला आहे.

टीव्हीकेला स्पष्ट बहुमत मिळण्यात अपयश आल्याने द्रमुक आणि अण्णाद्रमुकच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. यानंतर आता डीएमकेने पक्षप्रमुख एम. के. स्टॅलिन यांना राजकीय निर्णय घेण्याचे अधिकार दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुढील काही तासांमध्ये तमिळनाडूच्या राजकारणात कोणता ट्विस्ट येणार का, हे बघावे लागेल.

दरम्यान, राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांच्या भूमिकेमुळे टीव्हीके पक्षाच्या समर्थकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. काल टीव्हीकेच्या कार्यकर्त्यांनी लोकभवनाबाहेर आंदोलन करण्याचा प्रयत्न केला होता. आज पुन्हा एकदा टीव्हीकेकडून राजभवनाच्या परिसरात आंदोलन केले जाईल. काँग्रेसनंतर डाव्या पक्षांकडून विजय थलपती यांच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा दिला जाऊ शकतो. दोन्ही डाव्या पक्षांचे चार आमदार आहेत. त्यांनी साथ दिल्यास, थलपती विजय यांच्याकडील संख्याबळ ११६ इतके होईल. डाव्या पक्षांकडूनही राज्यपालांच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात शिंदेसेनेची संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त

शिर्डी (युवावार्ता प्रतिनिधी)-

उद्योगमंत्री तथा शिंदेसेनेचे अहिल्यानगर जिल्हा संपर्क मंत्री उदय सामंत यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील संघटनात्मक त्रुटी, कामातील कुचराई, पदाधिकाऱ्यांतील मतभेद व तक्रारी वाढत गेल्याने जिल्हा संघटनेची दक्षिण व उत्तर जिल्ह्यातील संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त केली. शिर्डी येथे संगमनेर, शिर्डी, राहुरी, नेवासा व श्रीरामपूर तालुक्यातील शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तालुका व जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेतला.



या बैठकीस आमदार अमोल खताळ, माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, शिवसेना नेते सागर बेग, जिल्हाध्यक्ष नितीन औताडे, प्रवक्ता संजीव भोर, यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नवीन कार्यकारिणीची निवड होईपर्यंत प्रभारी जिल्हाप्रमुख म्हणून नितीनराव औताडे, कमलाकर कोते, बाबुशेठ टायरवाले व अनिल शिंदे यांच्यावर जबाबदारी कायम ठेवली आहे.

आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी नव्या जोमाने व ताकदीने काम करण्याच्या सूचना उदय सामंत यांनी शिवसैनिकांना दिल्या. त्यांनी जिल्ह्यातील युवासेना, शिवसेना, महिला आघाडी, शहर व ग्रामीण, या सर्व कार्यकारिणी बरखास्त करण्याचे निर्देश दिले. लवकरच नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्याच्या शिंदेसेनेच्या महामंत्रीपदाची जबाबदारी सामंत यांच्यावर आहे. शिर्डी येथे साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन त्यांनी कामाला सुरुवात केली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सामंत यांचा हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

यावेळी हिंदी भाषेच्या परीक्षेबाबत ते म्हणाले, राज्य सरकारच्या शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी २८ जून रोजी आयोजित करण्यात आलेली हिंदी भाषेची परीक्षा तूर्तास स्थगित करण्यात आली आहे. शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी १९७६ च्या नियमानुसार एका अधिकाऱ्याने स्वतःच्या अधिकारात ही परीक्षा घेण्याचे निश्चित केले होते.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पाच हजार क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या हृदयविकार शस्त्रक्रिया यशस्वी




नाशिक (युवावार्ता प्रतिनिधी)-

हृदयविकार हा शब्द उच्चारताच सर्वसामान्य रुग्णांच्या मनात मोठी भीती निर्माण होते. मात्र, आधुनिक तंत्रज्ञान आणि निष्णात वैद्यकीय हातांच्या जोडीमुळे आता अशक्य वाटणाऱ्या हृदयशस्त्रक्रियाही यशस्वी होत आहेत. उत्तर महाराष्ट्रातील हृदयविकार उपचारांत डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांच्या नेतृत्वाखालील एसएमबीटी (एसएमबीटी) हृदयविकार शस्त्रक्रिया विभाग एक मोठा आशेचा किरण ठरला आहे. गेल्या १० वर्षांच्या प्रवासात तब्बल ४ हजार ८६९ हृदय शस्त्रक्रियांचा यशस्वी टप्पा पूर्ण करून या विभागाने वैद्यकीय क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे.

उत्तर महाराष्ट्रातील सर्वात अद्ययावत असलेल्या या विभागात केवळ नाशिकच नव्हे, तर जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहमदनगर जिल्ह्यांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी रेफर केलेले अत्यंत जटील रुग्ण उपचारासाठी दाखल होत आहेत. सर्वात प्रगत आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे डॉ. सिन्हा यांनी सांगितले.


या विभागाचे प्रमुख आणि प्रख्यात हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दशकात १ हजार ४८० बायपास सर्जरी (सीएबीजी) यशस्वीरीत्या पार पडल्या. तसेच हृदयाच्या झडपांशी संबंधित १ हजार २६१ वॉल्व्ह रिप्लेसमेंट आणि रिपेअर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. हृदयाच्या गुंतागुंतीच्या आजारांवरील उपचारात हा विभाग अग्रस्थानी असून, यात ६२ 'री-डू' (दुसऱ्यांदा होणाऱ्या) कार्डियाक सर्जरी आणि ४७ कार्डियाक ट्युमर (हृदयातील गाठी) वरील अत्यंत जोखमीच्या शस्त्रक्रियांचा समावेश आहे. यासोबतच रक्तवाहिन्यांशी संबंधित 'व्हॅस्क्युलर सर्जरी'मध्येही विभागाने मोठे यश मिळवले आहे.

या विभागात हृदयविकार रुग्णांची विशेष काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित आणि अनुभवी नर्सिंग स्टाफ २४ तास उपलब्ध आहे. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची होणारी रिकव्हरी ही पूर्णतः 'पोस्ट ऑपरेटिव्ह केअर'वर अवलंबून असते. येथील स्टाफच्या तत्परतेमुळे आणि आत्मीयतेमुळे रुग्ण अत्यंत वेगाने बरे होऊन आपल्या घरी परतत आहेत. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, तज्ज्ञ डॉक्टरांचा प्रदीर्घ अनुभव आणि शासकीय योजनांची जोड, यामुळे हा विभाग आज उत्तर महाराष्ट्रातील गोरगरीब आणि गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरला आहे.

हृदयात छिद्र असणे किंवा जन्मतः हृदयाचे दोष असणाऱ्या चिमुकल्यांसाठी हा विभाग संजीवनी ठरला आहे. गेल्या १० वर्षांत १ हजार १५५ बाल हृदय शस्त्रक्रिया (कॉन्जेनिटल कार्डियाक सर्जरीज) येथे यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत. अत्यंत लहान वयातील मुलांवर ओपन हार्ट सर्जरी करण्याचे मोठे आव्हान डॉ. सिन्हा आणि त्यांच्या टीमने लीलया पेलले असून, यामुळे शेकडो कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा एकदा हास्य फुलले आहे. यासोबतच दर महिन्याच्या अखेरच्या शनिवारी आणि रविवारी जन्मजात हृदविकार असलेल्या ३० ते ३५ बालकांवर डिव्हाईस क्लोजर हृदयविकार प्रक्रियादेखील केली जाते.

## कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी

# बहुजनांच्या शिक्षणक्रांतीचे शिल्पकार



ज्ञान हीच खरी सामाजिक क्रांतीची ताकद आहे, हे आपल्या कार्यातून सिद्ध करणारे, बहुजनांच्या आयुष्यात शिक्षणाचा सूर्य उगवणारे, महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील तेजस्वी पर्व म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. जात, धर्म, गरिबी आणि अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या ग्रामीण समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवणाऱ्या या महान शिक्षणमहर्षीचे कार्य आजही प्रेरणादायी दीपस्तंभासारखे समाजाला दिशा देत आहे.

(२२ सप्टेंबर १८८७ - ९ मे १९५९). महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक. सर्व जातिधर्मांच्या गरीब ग्रामीण रयतेला आपल्या भगीरथ प्रयत्नांनी त्यांनी आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य पाहून गाडगे महाराज (गाडगे महाराज) यांनी त्यांना कर्मवीर पदवी दिली. तेव्हापासून अनेक विद्वान व बहुजनसमाज आदराने आणि प्रेमाने त्यांना कर्मवीर म्हणू लागला. ते अण्णा या नावानेही परिचित आहेत.

भाऊराव यांचा जन्म कुंभोज (जि. कोल्हापूर) या खेड्यात पायगौंडा व गंगुबाई या जैन दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे मूळ घराणे मूडब्रिदी (जि. दक्षिण कन्नड - कर्नाटक) गावचे. देसाई हे त्यांचे मूळ आडनाव; परंतु पुढे त्यांच्या घराण्याला पाटीलकी मिळाल्याने ते देसाईचे पाटील झालेत. एतवडे बुद्रुक (जि. सांगली) येथे प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे ते कोल्हापुरात इंग्रजी सहावीपर्यंत शिकले. राजर्षी शाहूमहाराजांच्या प्रभावाखाली त्यांच्यावर समाजसेवेचे संस्कार झाले. विद्यार्थिदशेतच सातव्या एडवर्ड बादशाहाच्या पुतळ्यास डांबर फासल्याच्या खोट्या आरोपावरून त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. त्याला कंटाळून आत्महत्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु पुढे त्यांची सुटका होऊन त्यांनी कोल्हापूर सोडले.

भाऊराव हे ओगले काच कारखान्याचे व पुढे किर्लोस्कर नांगराचे १९१४ ते १९२२ या दरम्यान विक्रेते होते. या काळात ठिकठिकाणी खेड्यांत फिरल्यामुळे जनतेचे दारिद्र्य व शिक्षणाचा अभाव, यांची जाणीव त्यांना झाली. त्यातच १९०९ मध्ये दादा जिनप्पा मद्वण्णा यांनी आपल्या काही सहकाऱ्यांसह दूधगाव (जि. सांगली) येथे शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली होती. या शिक्षण संस्थेपासून प्रेरणा घेऊन कर्मवीरांनी १९१९ मध्ये कराडजवळील काले या गावी त्यांनी पहिले वसतिगृह काढले (१९१९). तोच रयत शिक्षण संस्थेचा शुभारंभ होता.

पुढे १९२४ मध्ये सातारा येथे अस्पृश्यांसह सर्व जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृह काढले. त्यास राजर्षी शाहू महाराजांचे नाव देण्यात आले. महात्मा गांधी (महात्मा गांधी) यांनी या वसतिगृहास १९२७ साली भेट दिली. त्या वेळी गांधीजींनी 'भाऊराव का कार्यही उनका सच्चा किर्तीस्तंभ है', अशी कर्मवीरांच्या कार्यांची प्रशंसा केली. तेव्हापासून भाऊराव खादी वापरू लागले व राजकारणापासून दूर राहून शिक्षणाच्या कार्यास त्यांनी पूर्णतः वाहून घेतले. गोरगरीब पण हुशार मुले जेथेजेथे खेड्यापाड्यांत दिसतील, तेथून त्यांना उचलून आणून वसतिगृहात ठेवून पोटच्या पोरांप्रमाणे सांभाळले. त्यांतील काही विद्यार्थांच्या परदेशी शिक्षणाची सोय पालक या नात्याने त्यांनीच केली. 'स्वावलंबनाने कष्ट करून शिका', या मंत्राबरोबरच भाऊरावांनी 'तुम्हास एक वर्षाची तयारी करायची असेल, तर धान्य पेरा आणि शंभर वर्षांची तयारी करायची असेल, तर माणसे पेरा', हा संदेश दिला.

भाऊराव हे बहुजनसमाजाच्या शैक्षणिक उद्धाराकडे वळले, त्याचे वास्तविक कारण सत्यशोधक चळवळीशी त्यांचा अत्यंत संस्कारक्षम अशा वयात आलेला निकटचा संबंध. या चळवळीतून बहुजनसमाजाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळावयाची, तर तिचा रोख शिक्षण प्रसाराच्या द्वारा त्या समाजातील अनिष्ट रूढी व अंधश्रद्धा नष्ट करण्याकडे असणे आवश्यक होते. भाऊरावांनी शिक्षणकार्य पतकरून हे साधण्याचा नेटका प्रयत्न केला. या कार्यामुळे विरोधक व सनातनी मंडळींचा रोष होऊन त्यांना जाच सहन करावा लागला. स्वतःच्या मातापित्यांची व समाजाचीही नाराजी त्यांनी ओढवून घेतली. सर्व जातिधर्माचे आजन्म कार्यकर्ते सेवक या संस्थेत तयार झाले. रयत शिक्षण संस्था खऱ्या अर्थाने जनतेची झाली. वटवृक्ष हे बोधचिन्ह व स्वावलंबी शिक्षण हे संस्थेचे बोधवाक्य ठरले. भाऊरावांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या कार्यास मनःपूर्वक साथ दिली. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा, अशी तीन अपत्ये झाली.

गांधींवधानंतरच्या उद्रेकात १९४७ साली संस्थेचे सरकारी अनुदान काही दिवस स्थगित करण्यात आले; पण कर्मवीर भाऊराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाणेदारपणाने लोकाश्रयावर संस्था पुढे चालविली व संवर्धित केली. कर्मवीर भाऊराव हे विलक्षण जिद्दीचे व धडाडीचे कार्यकर्ते होते. धिप्पाड शरीर, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि गरीब, पददलितांचा अंतर्यामी जिव्हाळा, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होत. महात्मा ज्योतीराव गोविंदराव फुले (महात्मा ज्योतीराव गोविंदराव फुले) व राजर्षी शाहू महाराज (राजर्षी शाहू महाराज) यांची शिक्षणप्रसाराची इच्छा त्यांनी पूर्ण केली. ते सत्यशोधक समाज (सत्यशोधक समाज) याचे एक महत्त्वाचे सदस्य होते. पुणे विद्यापीठाने त्यांना 'डी. लिट्.' ही सन्मान्य पदवी अर्पण केली. सद्गुरू गाडगेबाबांचेही रयत शिक्षण संस्थेस अमोल साह्य लाभले.

भाऊराव यांचे हृदयविकाराने पुणे येथे निधन झाले.

भाऊराव यांनी भगीरथ प्रयत्नांनी खेड्यापाड्यांत ज्ञानगंगा नेऊन पोचविली. त्यांची रयत शिक्षण संस्था ही आशियातील एक मोठी व नावलौकिक प्राप्त झालेली संस्था असून, तिच्या शाखा महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत व कर्नाटक राज्यात विस्तारलेल्या आहेत. त्यांमध्ये ३१ पूर्व प्राथमिक, ४२ प्राथमिक, ४३८ माध्यमिक आणि ४२ महाविद्यालये आहेत. तसेच गरीब व होतकरू मुलांसाठी ५१ आणि मुलींसाठी २९, अशी एकूण ८० वसतीगृहे आहेत (२०१९).

SUBSCRIBE YOUTUBE
Daily Yuvavarta

आपल्या व्यावसयाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यावसयाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



विवाह
भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# वाढत्या चोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर परप्रांतीय कामगारांची चौकशी

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिसरात मोठी मोहीम हाती घेतली असून यामध्ये रात्रीची गस्त वाढवली आहे. तसेच याच मोहिमेचा भाग म्हणून गेल्या दोन दिवसांपासून परिसरातील परप्रांतीय कामगारांची कसून चौकशी आणि झाडाझडती सुरू करण्यात आली आहे.

सहायक पोलीस निरीक्षक शिरसाट हे स्वतः निळवंडे कालव्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणांसह वीटभट्ट्या आणि मजुरांच्या वस्त्यांवर प्रत्यक्ष जाऊन पाहणी करत आहेत. या मोहिमेत त्यांनी निमगाव जाळी, चिंचपूर, मांची, झरेकाठी आणि खळी या गावांमध्ये विशेष शोधमोहीम राबवली. यावेळी त्यांना प्रामुख्याने राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांतील मंजूर कामासाठी मोठ्या प्रमाणात या परिसरात आल्याचे दिसून आले. पोलीस या सर्व मजुरांच्या आधारकार्डाची सखोल पडताळणी करत असून, संशयास्पद व्यक्तींची कसून उलटतपासणी केली जात आहे.

वाढत्या घटना रोखण्यासाठी स्थानिक नागरिक, व्यावसायिक, घरमालक किंवा कंत्राटदारांनी कोणत्याही परप्रांतीय मंजुराला कामावर ठेवताना अथवा घर भाड्याने देताना त्यांचे आधारकार्ड तपासूनच निर्णय घ्यावा आणि अशा नवीन व्यक्तींची माहिती तातडीने पोलीस स्टेशनला कळवावी, अशा सूचना दिल्या. याशिवाय त्यांनी हद्दीतील सर्व पोलीस पाटलांची विशेष बैठक घेऊन, आपापल्या गावातील परप्रांतीय व्यक्तींची माहिती गोळा करून त्यांची पडताळणी करण्याचे कडक निर्देश देखील दिले.

# लोकशाहीर संभाजी भगत यांचा जाहीर सत्कार

## पर्यायी सांस्कृतिक राजकारण उभे करण्यासाठी विद्रोही साहित्य संमेलनाची गरज



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -भारतातील सर्व भाषा या राष्ट्रभाषाच आहेत. हिंदीला राष्ट्रभाषा असल्याचा उल्लेख संविधानात नाही. मराठी भाषेचा १३०० ते १७०० हा सुवर्णकाळ होता. आपला साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी प्रागतिक शक्तींनी एकत्र येणे आवश्यक आहे असे परखड प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार विजेते तथा 'ताम्रपट' कादंबरीचे लेखक प्रा. रंगनाथ पठारे यांनी केले.

संगमनेर येथील डाव्या संघटनांच्या वतीने आयोजित लोकशाहीर संभाजी भगत यांच्या जाहीर सत्कार समारंभात ते बोलत होते. १५ व्या विद्रोही साहित्य संस्कृती संमेलनाच्या सातारातील अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संभाजी भगत यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अजित नवले होते. व्यासपीठावर ॲड. मिनल देशमुख, ॲड. रंजना गवांदे, ॲड. किरण रोहोम उपस्थित होते.

प्रा. पठारे म्हणाले, वारकरी संप्रदायाची खरी सुरुवात संत नामदेवांनी केली. संत नामदेवांचे साहित्य संपूर्ण भारतभर पोहोचले आहे. संभाजी भगत हे अण्णा गव्हाणकर, शाहीर अमर शेख आणि शाहीर अण्णाभाऊ साठे यांचा विद्रोही वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत.

लोकशाहीर संभाजी भगत यांनी आपल्या भाषणात सध्याच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, आज माणूस मोठ्या संकटात उभा आहे. संघर्षासाठी तात्विक विचारांची गरज आहे. संतांच्या सांस्कृतिक चळवळीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेला प्रेरणा दिली. महात्मा फुले यांच्या विचारांवर आधारित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान घडवले. आजच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी पर्यायी सांस्कृतिक राजकारण उभे करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व संघटना आणि पक्षांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अजित नवले म्हणाले, शेतकरी, बेरोजगारी, अत्याचार आणि अराजकतेविरोधातील संघर्ष अधिक व्यापक करण्यासाठी विविध चळवळींनी एकत्र येणे आवश्यक आहे. जात निर्मूलनासाठी सांस्कृतिक चळवळीची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांनी 'शिवाजी कोण होता' या पुस्तकावरून झालेल्या वादाचाही उल्लेख करत संबंधित पुस्तकाचे सामूहिक वाचन करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ कार्यकर्ते राजाभाऊ अवसक यांनी केले. सूत्रसंचालन संजयकुमार शिंदे यांनी केले, तर आभार हनुमंत उबाळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रजत अवसक आणि दत्ता ढगे यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तरुणाने सरकारी रस्त्यावर फिरवला नांगर, गुन्हा दाखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे गुरुवारी सकाळी एक अजब आणि धक्कादायक प्रकार घडला. गावातील एका तरुणाने चक्क ट्रॅक्टर घेऊन सरकारी रस्ताच नांगरून टाकल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे हा रस्ता प्रवरा डाव्या कालव्यालगत असल्याने सिंचन व्यवस्थेलाही धोका निर्माण झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेर-जोर्वे-उंबरी बाळापूर-दाढ बुद्रुक-कोल्हार या महत्त्वाच्या जिल्हा मार्ग क्रमांक २१ वर महेश उर्फ छोट्या अनिल सरोदे याने ट्रॅक्टरच्या साह्याने थेट नांगर फिरवला.

काही वेळातच रस्त्याचा मोठा भाग उखडून निघाल्याने वाहनधारक आणि ग्रामस्थ स्तब्ध झाले. या प्रकारामुळे केवळ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले नाही तर लगतच्या प्रवरा डाव्या कालव्याच्या माती भरावालाही धक्का बसला. त्यामुळे कालव्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनानेही या घटनेकडे गांभीर्याने पाहिले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राहाता कार्यालयातील कर्मचारी बबन ओव्हळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाणे येथे संबंधित तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता कलम ३२४ (५), २८५ तसेच महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, सरकारी रस्ताच नांगरल्याची चर्चा पंचक्रोशीत रंगली असून, हा प्रकार नेमका कोणत्या कारणातून घडला याबाबत विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक दीपक बर्डे करत आहेत.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

अंक वितरणासाठी मुले पाहिजेत
संपर्क
७६२०३८८२३०

# दहावी बोर्ड परीक्षेत वर्धन सराफचे घवघवीत यश

## संस्कृत आणि गणितात शंभर पैकी शंभर गुण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : पुणे येथील न्यू इंडिया स्कूल मधील विद्यार्थी वर्धन विश्वजीत सराफ याने दहावी बोर्ड परीक्षेत तब्बल ९४.६० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे वर्धनने संस्कृत आणि गणित या दोन्ही विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची चमक दाखवली आहे.

वर्धनच्या या यशामुळे संगमनेरसह सराफ परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वर्धनचे वडील विश्वजीत रमेश सराफ यांनी देखील दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षांमध्ये विक्रमी गुण मिळवत उच्चांक प्रस्थापित केला होता. आता त्याच यशस्वी परंपरेचा वारसा पुढे नेत वर्धननेही शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. वर्धन हा संगमनेर येथील प्रसिद्ध उद्योजक रमेश सराफ यांचा नातू असून, त्याच्या यशामुळे सराफ परिवाराचा शैक्षणिक आणि सामाजिक वारसा अधिक समृद्ध झाला आहे. वर्धनच्या या यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक आणि विविध स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
ॲंड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25